५७५
९-११-२१

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

---

दिनांक : ०९ नोव्हेंबर, २०२१

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

विषय :- ब्रेक द चेन अंतर्गत सुधारित मार्गदर्शक सूचना.
'ब्रेक-द-चेन' अंतर्गत महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या नियमांनुसार सर्व भोजनालये व उपहारगृह रात्री १२ तर इतर आस्थापना रात्री ११ पर्यंत खुली ठेवण्यास परवानगीबाबत...

संदर्भ :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५
३) महाराष्ट्र शासन, अधिसुचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. १३ मार्च,२०२०
४) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU-२०२०/C.R.९२/DisM-१, दि. १९ ऑक्टोंबर, २०२१

ज्या अर्थी, सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण राज्यातील काही भागात झाली आहे. सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (COVID-१९) प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी, वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आले आहे.

ज्या अर्थी, संदर्भिय शासन आदेश क्र. ४ अन्वये कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक कार्यवाहीच्या दृष्टीने काही निर्बंध लागू करणे आवश्यक असून, यापूर्वी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना व नियमांचे पालन करणे बंधनकारक राहिल.

आणि ज्याअर्थी, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी MISSION BEGIN AGAIN च्या अनुषंगाने यापुर्वी वेळोवेळी आदेश पारीत केले आहेत. **त्यासह महसूल व वन विभाग यांनी दिनांक १९ ऑक्टोंबर, २०२१ रोजीच्या ब्रेक द चेन अंतर्गत सुधारित निर्देश संदर्भ क्र. ४ अन्वये पारित केलेले आहेत.**

**त्याअर्थी, साथरोग प्रतिबंधक अधिनियम १८९७ च्या कलम २ अन्वये, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या सर्व संबंधित तरतुदींसह प्राप्त अधिकारांचा वापर करुन आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर हे शासनाने जाहीर केल्याप्रमाणे संदर्भ क्र. ४ मधील 'ब्रेक-द-चेन' अंतर्गत महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या नियमांनुसार सर्व भोजनालये व उपहारगृह रात्री १२ तर इतर आस्थापना रात्री ११ पर्यंत खुली ठेवण्यास परवानगीच्या अनुषंगाने शासन आदेशातील अटी व शर्ती उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये दिनांक ९ नोव्हेंबर, २०२१ रोजीपासून जसेच्या तसे लागु करीत आहे. सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.**

(पुढील पानावर)

तसेच दरम्यानच्या कालावधीत शासनाकडून अन्य कोणत्याही सूचना/आदेश प्राप्त झाल्यास त्यांचे अनुपालन करणे देखील बंधनकारक असेल.

उक्त आदेशाची सर्व संबंधितांनी तात्काळ अंमलबजावणी करावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० कलम, १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मा. डॉ.राजा दयानिधी (भा.प्र.से) आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी शहरवासीयांना केले आहे.

०५/११/२१

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका